नगरपरिषद प्रशासन संचालनालय
७वा मजला, बेलापूर भवन, नवी मुंबई महानगरपालिका इमारत,
सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

नपप्रसं २०२५/ म.मु.सोयी.सु .वि.ठो.त. /कक्ष-७/ 8962 दिनांक- 03 DEC 2025

वाचा:- १) नगर विकास, शासन निर्णय क्र-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२) नवी-१६, (ई-१०३४४१५) दि. २८ मार्च, २०२५.
२) नगर विकास, शासन निर्णय क्र-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-२)नवी-१६, (ई-१०३४४१५) दि.४ एप्रिल, २०२५.
३) शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२५/प्र.क्र.१८५(२)/नवि-१६(ई-१२७७९०६) दि.२४ नोव्हेंबर,२०२५.
४) शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२५/प्र.क्र.१८५(३)/नवि-१६(ई-१२७७९०६) दि.२४ नोव्हेंबर,२०२५.

**राज्यातील महानगरपालिका यांना सन २०२४-२५ साठी निधी वितरीत करण्याबाबत "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकास ठोक तरतूद" योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्याबाबत लेखाशीर्ष (४२१७०५४१) रक्कम रु.५,५०,००,०००/-(रक्कम रु.पाच कोटी पन्नास लाख फक्त) निधी वितरण आदेश क्र.१४.**

वाचा मधील नगर विकास विभाग शासन निर्णय क्र-१ व २ अन्वये सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" " लेखाशीर्ष (४२१७०५४१)" या योजनेअंतर्गत राज्यातील महानगरपालिकांना शासनाने वेळोवेळी आदेशीत केल्यानुसार निधी वितरीत करण्याकरिता संचालनालयास निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

उपरोक्त वाचा मधील संदर्भ क्र.३ व ४ च्या शासन निर्णयाचा निधी वितरण बाबत आदेश संचालनालयास प्राप्त झाले आहेत. सदर शासन निर्णयामधील "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" या योजनेखाली लेखार्शीर्ष (४२१७०५४१) **रक्कम रु.५,५०,००,०००/-(रक्कम रु.पाच कोटी पन्नास लाख फक्त )** इतका निधी वितरीत करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर आदेशामध्ये निधी हा वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय ,दिनांक ६ जून,२००८ मधील तरतुदीनुसार खर्च करणे बंधनकारक राहील असे नमूद केले आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.सोबत नमूद करण्यात आलेल्या विवरण पत्रातील परिशिष्ट अ मध्ये नमूद करण्यात आलेल्या

जिल्हाधिकारी /जिल्हा प्रशासन अधिकारी /जिल्हा नियोजन अधिकारी (संबधित), यांना नगरविकास विभाग, नवि-१६ कडील शासन निर्णयाद्वारे वितरीत करण्याचे आदेशीत केल्यानुसार संबधितांनी कळविलेल्या त्यांच्या बँक खात्यावर निधी वितरीत करण्यात येत आहे.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **परिशिष्ट-अ** | | | | | | |
| **आदेश क्र. १४** | | | | | | |
| **सन २०२४-२५ "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद" लेखाशीर्ष" "४२१७०५४१" अंतर्गत निधी वितरण.** | | | | | | |
| **अ.क्र.** | **जिल्हा** | **महानगर पालिका नाव** | **निधी वर्ग करण्यात आलेले कार्यालय** | **आदेश क्रमांक व दिनांक** | **रक्कम (आकडे रुपयात)** | **रक्कम (आकडे अक्षरात)** |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| **शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२५/प्र.क्र.१८५(२)/नवि-१६(ई-१२७७९०६) दि.२४ नोव्हेंबर,२०२५ अन्वये निधी वितरण** | | | | | | |
| १ | मुंबई उपनगर | बृहन्मुंबई महानगरपालिका | जिल्हाधिकारी/सहायक जिल्हा नियोजन अधिकारी,मुंबई उपनगर | मनपा-२०२४/प्र.क्र.२४६(क-२९)/ नवि-१६(ई-८२८२६९) दिनांक-११.१०.२०२४ | 3,50,00,000.00 | रुपये तीन कोटी पन्नास लाख फक्त |
| **एकूण रक्क रु.(अ)** | | | | | 3,50,00,000.00 | **रुपये तीन कोटी पन्नास लाख फक्त** |
| **शासन निर्णय क्रमांक:-मनपा-२०२५/प्र.क्र.१८५(३)/नवि-१६(ई-१२७७९०६) दि.२४ नोव्हेंबर,२०२५ अन्वये निधी वितरण** | | | | | | |
| २ | परभणी | परभणी महानगरपालिका | जिल्हाधिकारी/ जिल्हा प्रशासन अधिकारी,परभणी | मनपा-२०२४/प्र.क्र.२४६(क-५९)/ नवि-१६(ई-८२८२६९) दिनांक-१५.१०.२०२४ | 2,00,00,000.00 | रुपये दोन कोटी फक्त |
| **एकूण रक्क रु.(ब)** | | | | | 2,00,00,000.00 | **रुपये दोन कोटी फक्त** |
| **एकूण रक्क रु.(अ)+(ब)** | | | | | 5,50,00,000.00 | **रुपये पाच कोटी पन्नास लाख फक्त** |

वाचा मधील संदर्भ क्र. ३ व ४ च्या शासनाने निर्गमित केलेल्या मूळ शासन निर्णयामधील विहित केलेली कामे ,कार्यपद्धती, सर्व अटी व शर्ती लागू राहतील. त्यांचे काटेकोरपणे पालन करून जिल्हा नियोजन अधिकारी /जिल्हा प्रशासन अधिकारी व महानगरपालिका यांनी आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा. तसेच वितरीत करण्यात आलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र संबधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्यात यावे व सदर उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत संचालानालायास सादर करण्यात यावी. सदर निधी कामावर खर्च करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही,यांची संबधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

सदर निधी खात्यात जमा झाल्यानंतर,७ दिवसात निधी प्राप्त झाल्याची पोहोच संचालनालयास सादर करावी. आपली पोहोच प्राप्त न झाल्यास संचालनालय आदेशान्वये आपल्या कार्यालयास निधी प्राप्त झाला आहे असे ग्राह्य धरण्यात येईल.

मा. आयुक्त तथा संचालक, न.प.प्र.सं. यांच्या मान्यतेने.

(संजय काकडे)
सह आयुक्त
नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई

प्रत-

१. अवर सचिव, नगरविकास विभाग -१६, मंत्रालय, मुंबई -३२.
२. संबधित जिल्हाधिकारी / जिल्हा प्रशासन अधिकारी , जिल्हाधिकारी कार्यालय.
३. संबधित आयुक्त, महानगरपालिका.